दिन
की शुरुवात पॉजिटिव सोच के साथ !

पाटोदा
# लोकवास्तव
WWW.Patodalokvastav.com
संपादक: ऋतुजा पवार

बीड-महाराष्ट्र ■ वर्ष -१ ■ अंक १५ ■ मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर, २०२५ ■ टीसी-एमए एचएमए आर 53125 ■ किंमत २ रूपये ■ पाने ४

BEED-MAHARASHTRA ■ YEAR -1 ■ ISSUE-15 ■ Tuesday 7 October , 2025 ■ TC - MAHMAR53125 ■ Price-2 Rupees ■ Pages : 4

# पाटोदा मराठी पत्रकार परिषदेची दिशादर्शक बैठक

## पत्रकारांच्या अडचणी, नेतेमंडळींकडून जाहिरातीसाठी टाळाटाळ इत्यादी विषयावर चर्चा

मराठी पत्रकार परिषद, मुंबई
विचार, विकास,आणि प्रबोधन
बलशाली माध्यमांसाठी, मराठीच्या समृद्धतेसाठी

**पाटोदा । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाटोदा विश्रामगृह येथे सर्व तालुक्यातील पत्रकारांची एक दिशादर्शक बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये पत्रकारांच्या अडीअडचणी शासकीय अधिकाऱ्यांकडून मिळत नसलेल्या शासकीय जाहिराती तसेच नेतेमंडळींकडून जाहिराती मिळत नाहीत ज्या मिळतात त्यांची बिल लवकर मिळत नाहीत तसेच येऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची बैठक जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी, जिल्हा उपाध्यक्ष सचिन पवार, तालुकाध्यक्ष अजय जोशी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.. पत्रकार बांधव येणाऱ्या निवडणुकीत मोठा स्फोट करणार आहेत. पत्रकार काय करू शकतो हे संपूर्ण तालुकाच नव्हे जिल्ह्यालाही दिसणार आहे. अशा महत्त्वाच्या विषयावर आज चर्चा संपन्न झाली. नेतेमंडळींकडून वारंवार पत्रकारांना जाहिरातीतून टाळलं जात आहे. तसेच कधी जाहिरात दिलीच तर त्याची बिलही वर्षानुवर्ष लांबवली जातात. यावर सविस्तर चर्चा झाली. शासकीय अधिकाऱ्यांकडून देखील शासकीय जाहिराती मिळत नाहीत. अधिकारी पत्रकारांना टाळतात तसेच विशिष्ट पत्रकारांना हाताशी धरून वर्ष कडीला घेऊन जातात. हे सर्व विषय लक्षात घेऊन आज पाटोदा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने एक महत्त्वाची आणि दिशादर्शक बैठक संपन्न झाली यामध्ये नेतेमंडळी आणि शासकीय



अधिकाऱ्यांनाही येणाऱ्या काळात चांगली चपराक बसेल यात शंका नाही. विशेष म्हणजे येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले त्याचा खुलासा लवकरच केला जाईल असेही तालुकाध्यक्ष अजय जोशी यांनी सांगितले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी, जिल्हा उपाध्यक्ष सचिन पवार, कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे,तालुका सचिव हमीदखान पठाण, उपाध्यक्ष अनिल गायकवाड, अशोक भवर, जावेद शेख, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष गोकुळ इंगोले, सदस्य पवनकुमार भोकरे, सतीश गर्जे, हरिदास शेलार, बबन पवार, सय्यद सज्जाद, फयाज शेख प्रदीप उबाळे यांच्यासह पाटोदा तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहिरात नाही, बातमी नाही

**नेतेमंडळी पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या राजकीय सामाजिक कार्याच्या बातम्या वर्षभर कवर करतोत परंतु ज्यावेळी पत्रकारांना त्यांच्या हक्काची एखादी जाहिरात नेतेमंडळी पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून अपेक्षित असते त्यावेळेस मात्र हे सर्वच हात वर करतात आणि जाहिरात देण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे इथून पुढे जे नेते कार्यकर्ते पदाधिकारी जाहिरात देतील त्यांनाच आणि त्यांच्याच कामाला प्रसिद्धी द्यायची असा निर्णय पाटोदा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व सदस्यांनी एक मुखाने घेतला..**

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात होणार पत्रकारांची इंट्री!

**पत्रकारांना त्यांच्या हक्काचा अद्यापही कोणत्याच नेतेमंडळींकडून मिळालं नाही किंबहुना जाहिरातही अपेक्षा प्रमाण दिली जात नाही. ना पत्रकार भवन पत्रकारांना सुख सुविधा न त्यांना हक्काची जाहिरात मग का करायची पत्रकारिता असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा पत्रकार एक वेगळाच विचार करतात तसाच विचार आज पाठवता तालुक्यातील पत्रकारांनी केला आणि येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला.. तयारीही केली सुरू.. लवकरच महत्त्वाची बैठक घेऊन करणार उमेदवार जाहीर....**

# पाटोदा ते शंभरचिरा रोड ६.६१ कोटींचे बोगस काम : ॲड.जाधव

## पुन्हा नव्याने दर्जेदार काम करण्याचे कार्यकारी अभियंता यांचे आश्वासन



**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY) अंतर्गत चठङ ०१ राष्ट्रीय महामार्ग ५६१ जवळाला फाटा ते पाटोदा या ५.३ किलोमीटर रस्त्याचे (एकूण खर्च ६६१.११ लक्ष रुपये) काम दर्जाहीन व अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याची गंभीर तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी केंद्र व राज्य सरकारकडे ३ सप्टेंबर २०२५ रोजी केली होती. ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी संबंधितावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे ॲड. नरसिंह जाधव यांना पत्राद्वारे कळविले होते. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता बीड यांनी सध्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे काम करणे शक्य नाही, पाऊस थांबल्यानंतर काम करण्याची परिस्थिती निर्माण झाल्या नंतर सदर रस्त्याचे मानकाप्रमाणे दर्जेदार काम करून देण्यात येईल तदनंतर त्रयस्थ यंत्रणेद्वारे राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून तपासणीनंतर देयक अदा करण्यात येईल असे कळविले आहे.वरील आश्वासनानंतर प्रत्यक्ष इस्टीमेट प्रमाणे दर्जेदार काम न केल्यास लोकशाही मार्गाने व कायदेशीर मार्गाने पाटोद्यातील जनतेच्या वतीने लढा चालू ठेवणार असे ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी सांगितले.

## संबधित अधिकाऱ्याने त्याच्या कर्तव्यामध्ये कसूर केला असल्याचे उघड

**राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून गुणवत्ता व परिणामाची ४ वेळा तपासणी झाल्याचे सांगितले आहे त्यानंतर अवघ्या एका महिन्यातच सर्व रस्ता उखडला याचा अर्थ गुणवत्ता तपासणी अहवाल खोटे दिले. संबंधित अधिकाऱ्यांनी ऋदि.०९.०७.२०२५ रोजी च्या सविस्तर व पुराव्यासह दिलेल्या तक्रारिची दखल घेतली नाही. सदरील काम अतिशय निष्कृष्ठ असताना देखील झालेल्या कामाबाबत समाधानकारक शेरे प्राप्त आहेत असे सांगून अधिकाऱ्याकडून ठेकेदाराची पाठराखण करण्यात आली होती.**



# अभिजात भाषेच्या दर्जामुळेच मराठी भाषेची जागतिक स्तरावर ओळख निर्माण झाली - डॉ.गोविंद बामदळे

## जयभवानीत मराठी अभिजात भाषा दिन साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळेच मराठी भाषेची जागतिक स्तरावर ओळख निर्माण झाली आहे!असे प्रतिपादन प्रा.डॉ.गोविंद बामदळे यांनी केले.ते मराठी विभाग आयोजित मराठी अभिजात भाषा दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की मराठी भाषेची परंपरा प्राचिन आहे.चक्रधरस्वामी , मुकुंदराज, संत तुकाराम,संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा समृध्द केली आहे.आपण सर्वांनी सर्व क्षेत्रात तिचा वापर करावा असे त्यांनी शेवटी अहवान केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते तर व्यासपीठावर क्रिडाविभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रविण शिलेदार,नाटककार प्रा.बापू घोक्षे,प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान,प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.सर्व प्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते श्री.चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रस्ताविक प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी केले.प्रा.डॉ.प्रविण शिलेदार यांनी दोन शब्द व्यक्त केले.प्रा.बापू घोक्षे व प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी मराठी भाषेची परंपरा सांगुन तिचे महत्व सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी मराठी भाषेला प्राचिन परंपरा आहे.मराठी भाषेने सामाजिक,सांस्कृतिक,ऐत्याहासिक वारसा जतन केला आहे.त्यामुळे केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळेच ३ ऑक्टोबर हा अभिजात भाषा दिवस साजरा केला जातो.असे सांगितले.कार्यक्रमाचे संचलन कु.अस्मिता मुंढे या विद्यार्थीनीने केले.तर आभार कु.श्रावणी कांडेकर हिने व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागातील प्राध्यापक,विद्यार्थी व श्रीमती साळुबाई नाईकनवरे आदिनी अथक परिश्रम घेतले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# मेंगडेवाडी ग्रामस्थांचा रस्त्यासाठी रास्ता रोको!



## तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास थांबविण्याची मागणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रामपंचायत हद्दीतील मेंगडेवाडी गावाला आजवर डांबरी रस्ता मिळालेला नाही. दरवर्षी पावसाळ्यात ग्रामस्थांना तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. अनेक वेळा निवेदने, मागण्या करूनही प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने ग्रामस्थांचा संताप उसळला. आज (६ ऑक्टोबर, सोमवार) डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली वाघिरा फाटा (अहमदपूर-अहिल्यानगर महामार्ग) येथे ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. प्रशासनाने तातडीने मेंगडेवाडी-वाघिरा रस्ता सुरू न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. पोलीस अधिकारी व महसूल प्रशासनाला निवेदन देण्यात आले. ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कपिलधारवाडीत जमीन खचली; तातडीने सर्वेक्षण करा

## खा.बजरंग सोनवणे यांचे भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाला पत्र

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनीतील भेगा व जमीन खचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (GSI), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे, या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (GSI) केंद्रातील तज्ज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी



परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे. या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी. या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. याच आशयाचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडनवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री अजितदादा पवार यांना देऊन या गंभीर बाबीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

# विद्यार्थीप्रिय शिक्षक सुरेश मंत्री 'राष्ट्राचे शिल्पकार' पुरस्काराने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



शिक्षक म्हणजे केवळ ज्ञानदाता नव्हे तर समाजमनाचे शिल्पकार असतात, याचे जीवंत उदाहरण म्हणजे तालुक्यातील देवळा येथील विश्वरूपी माध्यमिक विद्यालयात कार्यरत असणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक सुरेश मंत्री. त्यांची शिक्षणसेवा व सामाजिक बांधिलकीची दखल घेत अंबाजोगाई इनरव्हिल क्लब तर्फे त्यांना मानाचा 'राष्ट्राचे शिल्पकार' पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि. १ ऑक्टोंबर रोजी येथील रोटरीच्या सभागृहात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती मुमताज पठाण यांच्या हस्ते सुरेश मंत्री यांना हा बहुमान देण्यात आला. २४ वर्षांपासून शिक्षक म्हणून कार्यरत असलेले सुरेश मंत्री हे विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहेत. ते नियमितपणे सामाजिक, शैक्षणिक व राजकिय घडामोडींवर लेखन करत असतात. राज्यातील अनेक विभागीय व स्थानिक वृत्तपत्रांमधून त्यांचे स्तंभलेखन प्रकाशित झाले असून विचारमंथन हा त्यांचा लेखसंग्रह वाचकांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. राष्ट्रीय परिसंवादामध्ये त्यांनी शोधनिबंध सुद्धा सादर केले असून साहित्य व पुस्तक परीक्षण क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. यापूर्वीही येथील रोटरी क्लबकडून पुरस्काराने गौरविण्यात आलेले सुरेश मंत्री यांना आता अंबाजोगाई इनरव्हिल क्लब कडून राष्ट्राचे शिल्पकार पुरस्कार हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. संस्थेचे सचिव राजेंद्र लोमटे, उपाध्यक्ष सतीश लोमटे, मुख्याध्यापक एस. जी. खोसे व शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावक-यांनी त्यांचे याबद्दल अभिनंदन केले आहे.